पुण्यनगरी दि 16/09/23

# दरोड्याच्या तयारीत असलेले ६ जण जेरबंद

**नांदेड/प्रतिनिधी**

विष्णुपुरी येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाजवळील झरी पांगरा जाणाऱ्या रस्त्यावर ६ जण दरोड्याच्या तयारीत असताना त्यांना नांदेड ग्रामीण पोलिसानी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३१ हजार ४२० रुपयांचे घातक शस्त्र व मोबाईल जप्त करण्यात आली. ही कारवाई १५ सप्टेंबर रोजी रात्री १२.५५ वाजता करण्यात आली.

विष्णुपुरी येथील स्वारातीम विद्यापीठाजवळील झरी-पांगरा जाणाऱ्या रस्त्यावर नांदेड ग्रामीण पोलिसांना चंद्रकांत ऊर्फ बबलु धोत्रे, २२, बुध्दभुषण ऊर्फ नागेश कांबळे,१९, परमेश्वर ऊर्फ बबल्या जोंधळे, १९, रोहित ऊर्फ चिटया धोत्रे,१९, सुरेंन्द्र ऊर्फ बाळु मल्हारे, २५, रुषी ऊर्फ मनोज गर्जे,१७ , सर्व रा. भिमवाडी ता.जि.नांदेड. यांना नांदेड ग्रामीण पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून घातक हत्यार व मोबाईल असा एकुण ३१ हजार ४२० रुपयांचे साहित्य जपत करण्यात आले आहे. त्याच्याजवळ दोरा चाकू, खंजर मिळून आले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या तक्रारीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात ६७० / २३ नुसार भादंविच्या कलम ३९९, ४०१, ४०२ सह कलम ४ / २५ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक गोविंद जाधव अधिक तपास करीत आहेत.